**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी**
**बांधकाम विभाग**

**प्रस्तावना:-**

**विषय:- वॉर्ड क्र.14 मध्ये शांतीनगर येथील बौध्दविहार बांधकाम करणे.**

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजने अंतर्गत वॉर्ड क्र.14 मध्ये शांतीनगर येथील बौध्दविहार बांधकाम करणे कामी रक्कम रु.४४,७७,९००/- मात्र प्रस्तावास मा.आयुक्त सो यांची दिनांक ०३/०१/२०२१ रोजी मंजुरी प्राप्त झाली असुन त्यानुसार क्र.सामान्य/कक्ष-३/टे-२/नपा/कवि-भिनिमपा २०१९-२०/एफ /५०६ दि.०२/०६/२०२१ नुसार मा.जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे,यांचे कडुन प्रशासकिय व आर्थिक मान्यता प्राप्त झाली आहे. सदर कामाची रक्कम रु. ४४,७७,९००/- २ रे कॉल ई-निविदा सुचना क्र.१४८/२०२१-२२ (७३८५००१) दि.११/११/२०२१ रोजी दैनिक लोकसत्ता,प्रातकाल,मिड डे वर्तमानपत्रात जाहीरात देवुन तसेच महाराष्ट्र शासनाच्या (www.mahatenders.gov.in) संकेतस्थळावर प्रसिध्द करुन ब-१ प्रकारची ई निविदा मागविणेत आली असता सदर कामासाठी एकुण २ निविदा प्राप्त झाल्या असुन त्यापैकी पात्र झालेल्या निविदा खालीलप्रमाणे आहेत.

| अनु क्रं. | निविदाकारांची नावे | निविदेतील दर |
|---|---|---|
| १ | **मे.शुभम कन्स्ट्रक्शन** | अंदाजपत्रकिय दरापेक्षा२.०० % कमी दराने |
| २ | तुषार मोहन चौधरी | अंदाजपत्रकिय दराने |

वरील पैकी **मे.शुभम कन्स्ट्रक्शन**, यांची अंदाजपत्रकिय दररपेक्षा २.००% कमी दराची म्हणजेच रक्कम रु.४३,८८,३४१/- (रु.त्रेचाळीस लाख अठयाएंशी हजार तीनशे एकेचाळीस मात्र) च्या खर्चाची निविदा संविदा करणे कामी प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे मा.आयुक्त महोदय यांनी मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये संविदा करणे कामी व प्रशासकिय व आर्थिक मान्यता घेऊन कार्यादेश देण्यात आले आहे.परंतु याकामी संविदा मंजुरीकरिता यापुर्वी ठराव घेण्यात आला नसल्याने आजमितीस कार्योत्तर मंजुरी करिता प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

ठराव क्र.:- ८५३ | दिनांक :- ११/०७/२०२४

मे. शुभम कन्स्ट्रक्शन, यांची अंदाजपत्रकिय दररपेक्षा २.००% कमी दराची म्हणजेच रक्कम रु.४३,८८,३४१/- (रु.त्रेचाळीस लाख अठयाएंशी हजार तीनशे एकेचाळीस मात्र) ची निविदा मंजुरीस शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त् अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग,मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/(भाग-२)नवि-१४,दिनांक ०६ जुन २०२२ अनव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ (१अ) मधिल तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका वॉर्ड क्र.14 मध्ये शांतीनगर येथील बौध्दविहार बांधकाम करणे कामी सर्वात कमी दराचे निविदाकार मे.शुभम कन्स्ट्रक्शन, यांचे समवेत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये संविदा करण्यास मंजुरी देत आहे.

(अजय वैद्य)
प्रशासक तथा आयुक्त
भिवंडी नि.श.महानगरपालिका